# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 05.05.2023** **वार –रवीवार**

---

**प्रचार संपला**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठीचा प्रचार आज संपला. पुणे जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात बारामती लोकसभा मतदासंघात येत्या ७ मे रोजी मतदान होत असून मतदानाच्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिली आहे. दरम्यान, बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी अजित पवार यांनी आज इंदापूर इथं जाहीर सभा घेत प्रचाराची सांगता केली. तर महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज बारामतीमध्ये जाहीर सभा घेऊन प्रचाराची सांगता केली.

वाढते तापमान लक्षात घेता बारामती लोकसभा मतदार संघात निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसच मतदारांसाठी १ हजार ७२४ प्रथमोपचार पेट्या आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी १० ओआरएसच्या पाकिटांचे वितरण आज कृषी महाविद्यालय येथील वितरण केंद्रातून करण्यात आले.

**प्रशिक्षण**

मावळ लोकसभा निवडणुकीसाठी पिंपरी विधानसभा कार्यालयांतर्गत नियुक्त करणात आलेले अधिकारी आणि कर्मचा-यांचे दुसरे प्रशिक्षण नुकतेच पार पडले. प्रशिक्षणासाठी १ हजार ८३७ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या दरम्यान मतदानाच्या आदल्या दिवशी आणि मतदानाच्या दिवशी करावयाचे कामकाज आणि त्या अनुषंगाने EVM, VVPAT हाताळणी, जुळणी याबाबत सर्व सेक्टर ऑफीसर यांना मार्गदर्शन करण्यात आल.

**बाइक रॅली**

पुणे लोकसभा मतदारसंघाचे एमआयएम पक्षाचे उमेदवार अनिस सुंडके यांच्या प्रचारानिमित्त आज बाइक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात तरुणांचा सहभाग होता.

**स्त्री - पुरुष गुणोत्तर**

पुणे शहरात यावर्षी मार्चपर्यंत एक हजार मुलांमागे केवळ ९२९ मुलींचा जन्म झाल्याच पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे असलेल्या नोंदीतून दिसून आल आहे. हे गुणोत्तर पाहता या पीसीबीएनडीटी कायद्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे, असं आवाहन उपआरोग्य अधिकारी डॉ. कल्पना बळीवंत यांनी केलं आहे.

**पाणी**

पुणे शहर आणि परिसरात सध्या सुरु असलेल्या एकंदर ७२७ बांधकाम प्रकल्पांपैकी केवळ ८ प्रकल्पांमध्ये बांधकामासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर सुरु असून उर्वरित सर्व प्रकल्पामध्ये बांधकामासाठी महापालिकेकडून मिळणारे शुद्ध पाणी वापरलं

जात असल्याची माहिती समोर आली आहे. पुणे शहर आणि जिल्ह्यात निर्माण झालेल्या गंभीर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिकेनं नुकत्याच केलेल्या पाहणीत ही माहिती उघड झाली आहे. नोटिसा बजावण्याची निर्णय घेण्यात आला आहे. शिवाय या संबंधी शहरातील बांधकाम व्यावसायिकांची एक बैठक या आठवड्यात घेतली जाणार असल्याचं देखील सांगण्यात आलं.

**पाणी पुरवठा**

दरम्यान पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पातील शिल्लक पाणी साठा लक्षात घेता येत्या १३ तारखेला होणाऱ्या मतदानानंतर, पुणेकर नागरिकांना पाणी कपातीचा सामना करावा लागण्याची शक्यता असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**पुणे आरटीओ**

पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून परराज्यातील आरटीओमध्ये वाहनांच्या नोंदी करून महाराष्ट्रात येऊन व्यवसाय करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सच्या बसेस वर पुण्यातील आरटीओकडून कारवाई सुरू करण्यात आली आहे. अशा 55 बस मालकांवर पुणे आरटीओने कारवाई करून दंड वसूल केला आहे.

स्पर्धा पुणे जिल्हा हवेली बॅडमिंटन संघटनेच्या मान्यतेने एसबीए कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये 15 वर्षाखालील मुलांच्या गटात वरद लांडगे, सोहम धामे, निक्षेप कात्रे आणि श्रेयस मासळीकर यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला तर चैतन्य खरात, निक्षेप कात्रे, जयंत कुलकर्णी यांनी पुरुष एकेरीत उपांत्य फेरीत धडक मारली.

**बाजारभाव**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्र सह इतर राज्यातून नव्वद ट्रक फळ भाज्यांची आवक झाली. उन्हामुळे आवक कमी झाली त री मागणी वाढल्याने घेवडा, फ्लॉवर, मटार ,शेवगा आणि कांदा भावात वाढ झाली. वाढत्या उन्हाचा फटका पालेभाज्यांना बसला असून जवळपास सर्वच पालेभाज्यांच्या भावात वाढ झाली आहे. कोथिंबिरीच्या एक लाख तर मेथीच्या पन्नास हजार जुड्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने लिंबाचे दर 20 टक्क्यांपर्यंत महागले आहेत. उष्णतेचा फटका फुल बाजाराला मोठ्या प्रमाणावर बसला असून आज बाजारात चांगल्या प्रतीच्या मालाची आवक कमी होती मागणी नसल्याने चांगल्या प्रतीच्या मालाचे भाव स्थिर होते .

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 41 अंश तर किमान तापमान 22 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सयस नोंदवल गेलं; उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**